विनम्र अभिवादन!



श्री अक्कलकोट स्वामी महाराज प्रकट दिन.

विनम्र अभिवादन!

संत झुलेलाल जयंती.

शिल्पकार विकासाचा...

देशदूत

ईद मुबारक

सर्व मुस्लिम बांधवांना रमाजन ईदच्या हार्दिक शुभेच्छा!

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नंदुरबार | वर्ष २७ । अंक २०५ । सोमवार, दि. ३१ मार्च २०२५ । पाने - ८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

संपादकीय

मानसिकता बदलाची अजूनही प्रतीक्षाच

मुलींच्या शिक्षणातील अडथळे अजूनही थांबायला तयार नाहीत. देशाची क्षमता वृद्धिंगत होण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार मुलींच्या शिक्षणाचा विशेष विचार केल्यास केंद्र सरकार सांगते. मुलींना उच्चशिक्षण मोफत असल्याचे आणि त्यात अडचणी असतील तर संपर्कासाठी एक क्रमांक राज्य सरकार जाहीर करते. अनेक योजना राबवल्या जात असल्याचा दावा सरकारे करतात. तरीही शिक्षण घेण्यासाठीचा मुलींचा संघर्ष दिवसेंदिवस तीव्र होताना आढळतो. तुळजापूरमध्ये मायलेकीच्या आत्महत्येचे प्रकरण नुकतेच उघडकीस आले. त्यांच्या मृतदेहाजवळ त्यांनी एक चिठ्ठी लिहून ठेवलेली सापडली. त्यानुसार मुलीला शिकू न देता तिचा विवाह लावून दिल्याने मुलगी व तिच्या आईने आत्महत्या केली, असे पोलिसांनी माध्यमांना सांगितले. याविषयी पोलिसांच्या अधिक पडताळणीनुसार घटनेवर अधिक प्रकाश पडेल कदाचित, पण सामान्य स्तरावर मुलींना शिक्षण घेण्यासाठी लढावे लागते हे वास्तव आहे. याविषयीची आकडेवारी आणि सर्वेक्षणांचे निष्कर्षही अधून-मधून प्रसिद्ध होतात. तेही या वास्तवाकडेच अंगुलीनिर्देश करतात. त्याची अनेक कारणेही त्यात नमूद असतात. उदाहरणार्थ, साधनांची अनुपलब्धता, शिकण्यासाठी दूर जावे लागणे, कौटुंबिक परिस्थिती वगैरे. पण त्या सगळ्यांचे सार समाजाच्या मुलींकडे बघण्याच्या पारंपरिक मानसिकतेत दडलेले आढळते. कितीही शिकली तरी मुलगी म्हणजे परक्याचे धन...! शेवटी चूल आणि मूलच सांभाळायचे... तिच्या शिक्षणाचा तिच्या पालकांना फायदा...! या दृष्टीकोनाची पाळेमुळे अजूनही खोलवर रुजलेली आहेत. सुनीता विल्यम्स अंतराळातून सुखरूप परत आल्या. त्या मुद्याला धरून तीन महिलांमधील संवादाची एक छोटीशी विनोदी ढंगाची गोष्ट समाज माध्यमातून फिरली. तिला तिच्या पतीने (गोष्टीत नवऱ्याने) बरे पाठवले. तिला वाळवण किंवा घरकाम नसते का? या काळात तिची मुले कोणी सांभाळली असतील? असे अनेक प्रश्न त्या महिलांना पान २ वर

संघ, भाजपामधील दरी मिटली

पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून रा.स्व.संघाची स्तुती

नागपूर । राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गौरवशाली प्रवासाला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. जर आपण आपल्या देशाच्या इतिहासावर नजर टाकली तर शेकडो वर्षांच्या गुलामगिरी आणि आक्रमणांदरम्यान, भारताची सामाजिक रचना नष्ट करण्याचे क्रूर प्रयत्न झाले. पण भारताची जाणीव कधीच संपली नाही, त्याची ज्योत तेवत राहिली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ एका महान वटवृक्षाप्रमाणे जगासमोर उभा आहे. हा केवळ एक सामान्य वृक्ष नसून, भारताच्या अमर संस्कृतीचा अक्षयवट आहे, अशी स्तुती करीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपा आणि संघामधील दरी संपुष्टात आणली.

लोकसभा निवडणुकीवेळी भाजपाचे अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी भाजपा परीपक्व झाला असून संघाची गरज नसल्याचे पान २ वर

दीक्षाभूमीची भेट हे सौभाग्य

नागपूरातील दीक्षाभूमीवर दाखल झाल्यानंतर, पंतप्रधान मोदींनी तिथल्या अभ्यागत पुस्तकात लिहिले की, बाबासाहेब आंबेडकरांच्या पंचतीर्थांपैकी एक असलेल्या नागपूरमधील दीक्षाभूमीला भेट देण्याचे सौभाग्य मिळाल्याने मी भारावून गेलो आहे. या पवित्र स्थळाच्या वातावरणात बाबासाहेबांचे सामाजिक सौहार्द, समता आणि न्यायाचे तत्व अनुभवता येते. दीक्षाभूमी आपल्याला गरीब, वंचित आणि गरजूंना समान हक्क आणि न्याय देणारी व्यवस्था घेऊन पुढे जाण्याची ऊर्जा देते असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

हेडगेवार, गोळवलकरांकडून नवीन उर्जा

गुलामीच्या अखेरच्या काळात हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजींनी त्याला नवीन ऊर्जा देण्याचे काम केले. राष्ट्रीय चेतनेच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी जे विचार बीज १०० वर्षापूर्वी पेरले. ते महान वटवृक्ष बनून जगासमोर आहे. सिद्धांत आणि आदर्शाने या वटवृक्षाला उंची दिली आहे. आम्ही केवळ वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या दुप्पट केली नाही तर एम्स संस्थांची संख्याही वाढवली आहे. अधिकाधिक डॉक्टर उपलब्ध व्हावेत यासाठी वैद्यकीय जागांची संख्याही दुप्पट करण्यात आली आहे. देशातील गरीब मुलांना डॉक्टर बनता यावे यासाठी, आम्ही पहिल्यांदाच मातृभाषेत वैद्यकीय शिक्षण दिले आहे जेणेकरून ते कोणत्याही भाषेच्या अडथळ्याशिवाय त्यांची स्वप्ने पूर्ण करू शकतील, अंसही नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

कामाख्या एक्सप्रेसचे ११ डबे रुळावरुन घसरले

एक जण ठार : बंगळुरु-आसाम मार्गावर अपघात

कटक । ओडिशात पुन्हा एकदा रेल्वेचा मोठा अपघात झाला आहे. याठिकाणी बंगळुरू-आसाम या मार्गावरील कामाख्या एक्सप्रेसचे ११ डबे रूळावरून घसरले. या घटनेनंतर प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. ही ट्रेन चौद्वार परिसरातील मंगुली पेसेंजर हॉल्टजवळ रुळावरून घसरली. सध्या रेल्वेने याठिकाणी रेस्क्यू ऑपरेशनसाठी एनडीआरएफ आणि मेडिकल पथके पाठवली आहेत. दरम्यान या घटनेत एक जण ठार झाल्याची माहिती मिळाली असून आठ जण जखमी झाले आहेत.

ओडिशाच्या कटकमधील चौद्वारजवळ बंगळुरू-कामाख्या सुपरफास्ट एक्सप्रेस रूळावरून खाली घसरली. या ट्रेनचे ११ डबे घसरल्याने नीललाच एक्सप्रेस, धौली एक्सप्रेस, पुरूलिया एक्सप्रेसचा मार्ग बदलण्यात आला आहे. घटनास्थळावर बचाव कार्य आणि प्रशासन हजर आहे. मेडिकल टीम, एनडीआरएफ सोबतच अग्निशमन दलाचे कर्मचारीही रेस्क्यू ऑपरेशनमध्ये सहभागी आहेत. याठिकाणी अडकलेल्या प्रवाशांना सुरक्षित त्यांच्या ठिकाणांवर पान २ वर

राज्य सरकारला गावबंदी करणार!

जालना । विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीच्या नेत्यांकडून शेतकरी कर्जमाफीचं वचन देण्यात आले होते. पण ते वचन सरकारकडून अद्याप पूर्ण करण्यात आलेले नाही. निवडणुकीत विजय मिळवून चार महिने होत आले तरी सरकारकडून ना लाडक्या बहिणींना दिलेले २१०० रुपये मदतीचे आश्वासन पुर्ण करण्यात आले, ना कर्जमाफीचे. विशेष म्हणजे अजित पवारांच्या वक्तव्यानुसार यंदा शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळण्याची शक्यता धुसर आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारला गावंबदी करणार असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

कर्जमाफीवरुन मनोज जरांगेंचा पुन्हा इशारा

गेल्यावर्षी मराठा आरक्षणाचा मुद्दा तापला तेव्हा राज्यभरातील अनेक गावांमध्ये मराठा समाजाकडून नेतेमंडळींना गावबंदी करण्यात आली होती. आता शेतकरी कर्जमाफीवरुन नेतेमंडळींसाठी गावबंदी करण्याचा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. गावबंद मोहीमेमुळे सरकार अडचणीत येऊ शकते. त्यामुळे मनोज जरांगे यांच्या भूमिकेवर सरकार काय निर्णय घेते? ते पाहणे देखील महत्त्वाचे आहे.

आंदोलन हाती घेणार

कर्जमाफी देणार नसाल तर यांना गावबंदी मोहिम हाती घेणार, हे सरकार संपूर्ण कर्जमुक्ती करणार नसेल तर आंदोलन हाती घेऊन ह्यांना गावबंदी करू, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

मला हिंदुत्व शिकवू नका!

राज ठाकरे यांची सरकारवर घणाघाती टीका

मुंबई । कुंभमेळ्याचं पाणी प्यायलो नाही असं म्हटल्यावर नवीन वारं गेलेल्या हिंदुत्ववाद्यांना वाटलं की मी कुंभमेळ्याचा अपमान करतोय. पण प्रश्न हा कुंभमेळ्याचा नाही तर गंगेच्या पाण्याचा आहे असं राज ठाकरे म्हणाले. गंगेमध्ये अर्धवट जाळलेली प्रेतं टाकली जातात. गंगेचं पाणी हे पिण्यासाठी नाही तर अंघोळीसाठीही योग्य नाही असं राज ठाकरे म्हणाले. ज्यांना या गोष्टी कळत नाहीत त्यांनी मला हिंदुत्व शिकवू नयेत असंही राज ठाकरे यांनी ठणकावलं.

गुढीपाडव्यानिमीत्त मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची रविवारी शिवतीर्थावर सभा पार पडली. यावेळी त्यांनी राज्य व केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. राज ठाकरे म्हणाले की, कुंभमेळ्यातून पाणी आणलेलं पिणार नाही असं सांगितलं. नव्याने वारं शिरलेल्या हिंदुत्ववाद्यांना वाटलं की मी कुंभमेळ्याचा अपमान केला. ज्या नदीला आपण माता म्हणतो, देवी म्हणतो त्यांची अवस्था ही भीषण आहे. गंगा साफ करावी असे पहिल्यांदा राजीव गांधी यांनी म्हटले. त्यांनी ते कामही सुरू केले. पान २ वर

माथी भडकविण्याचे काम

राज ठाकरे पुढे म्हणाले की, राजकारणाचा चिखल झालेला आहे. धर्माच्या नावावरून माथी भडकविण्याचे काम केले जात आहे. मुळ प्रश्नांना बगल दिली जात आहे. लाडकी बहीण योजना बंद होणार हे आधीच सांगितले होते. कर्जमाफी मिळणार नाही हे देखिल बोललो होतो. त्यामुळे जनतेनेच याबाबत आता ठरवायचे आहे असा हल्लाबोलही त्यांनी केला.

वचनभंग करणाऱ्या अजित पवारांनी राजीनामा द्यावा!

ठाकरे गटाचे खा.संजय राऊत यांची मागणी

मुंबई । बीड प्रकरण, परभणी प्रकरण, शेतकरी कर्जमाफी, लाडकी बहीण योजनेचे २१०० रुपये, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दलची आक्षेपार्ह विधाने, अशा काही मुद्यांवरून महाविकास आघाडीचे नेते चांगलेच आक्रमक झाले असून, यातच ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

अर्थमंत्री अजित पवार यांची विधानसभा निवडणुकीची भाषा, तसेच एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस यांची भाषा वेगळी होती. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ इथपासून शेतकऱ्यांची कर्जमाफी करणारच यावर जोर देऊन हे तिन्ही नेते बोलत होते. आता अजित पवारांनी हात वर केले आहेत. अजित पवार कर्जमाफी करु शकत नसतील, लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ शकत नसतील तर राज्यातील जनतेल्या दिलेल्या वचनांचा भंग केल्याबद्दल नैतिकतेच्या मुद्द्यावर त्यांनी स्वतःहून राजीनामा दिला पाहिजे, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

देवगिरीवर जाऊन उपोषणाला बसावे

अजित पवार आणि त्यांच्या पक्षाने लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ कर्जमाफी देऊ या घोषणा केल्या तेव्हा राज्याच्या मुख्यमंत्रिपदी एकनाथ शिंदे होते. त्यामुळे ही जबाबदारी एकनाथ शिंदेंची जास्त आहे. एकनाथ शिंदे वचन पूर्ण कसे करणार? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आता नाही म्हणत आहेत. एकनाथ शिंदेंनी एक करावे, जोपर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफी देत नाहीत आणि लाडक्या बहिणींना २१०० रुपये देत नाहीत, तोपर्यंत मी देवगिरी बाहेर उपोषणाला बसेन अशी भूमिका घ्यावी. लाडके भाऊ आहात ना? मग त्यांनी जनतेच्या प्रश्नांसाठी उपोषणाला बसले पाहिजे, असा खोचक सल्ला संजय राऊतांनी दिला.

दहा हजार जणांच्या मृत्यूच्या भीतीची शक्यता

म्यानमार । म्यानमारमध्ये घडलेल्या भूकंपाच्या घटनेमुळे संपूर्ण जग सुन्न झालं आहे. भूकंपाची तीव्रता ही तब्बल ७.७ रिश्टर स्केल इतकी होती. या भूकंपात अनेक मोठमोठ्या इमारती जमीनदोस्त झाल्या आहेत. या भूकंपात आतापर्यंत १६०० पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला आहे. या भूकंपातून तब्बल ३३० अणुबॉम्बच्या शक्तीएवढी ऊर्जा बाहेर पडली, असा दावा भूगर्भशास्त्रज्ञांनी केला आहे. विशेष म्हणजे या भूकंपानंतर १० हजार जणांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शिर्डीला जाणाऱ्या भाविकांचा पाच लाखांचा विमा

अहिल्यानगर । शिर्डीला साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या वाहनांना अपघात होण्याच्या घटना अनेकदा होतात. यामध्ये अनेकांचा जीव जातो. त्यामुळे भक्तांची सुरक्षा लक्षात घेऊन शिर्डीच्या साईबाबा संस्थानने भक्तांसाठी पाच लाखांचा विमा उतरवण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी एका कंपनीशी करार केला असून त्यासाठी लागणारा हप्ताही कंपनीकडे जमा करण्यात आला आहे, अशी माहिती संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली. गुढी पाडव्याच्या निमित्ताने साईबाबा संस्थानने भाविकांसाठी ही भेट दिली आहे. यासाठी शिर्डीला येणाऱ्या भाविकांनी संस्थानच्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. देश-विदेशातील सर्व भक्तांसाठी ही योजना लागू आहे. घरातून निघताना भाविकांनी संस्थानच्या संकेतस्थळावर नोंदणी करायची. वाटेत अपघात अगर अन्य दुर्घटना घडली, तर पाच लाखापर्यंतच्या विम्याची नुकसान भरपाई अपगातग्रस्त साईभक्ताला किंवा त्याच्या कुटुंबियांना देण्यात येणार आहे.

केळी भाव

नवती (१) : 1925
नवती (२) : 1725

मिरकीली

आयपीएस हेमंत निंबाळकरांना मुख्यमंत्री पदक जाहीर

कोल्हापूर । कोल्हापूरचे सुपूत्र कर्नाटक राज्य गुप्तचर विभागाचे संचालक आणि डॅशिंग आयपीएस अधिकारी हेमंत निंबाळकर यांना मुख्यमंत्री पदक जाहीर करण्यात आले आहे. कर्नाटकात हेमंत निंबाळकर यांच्यासह गुप्तचर विभागातील २२ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मुख्यमंत्री पदकाने सन्मानित करण्यात येईल.

आयपीएस अधिकारी हेमंत निंबाळकर १९९८ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. एका मराठी अधिकाऱ्याने कर्नाटकात ठेवलेला दबदबा नेहमीच कौतुकास्पद आणि अभिमानास्पद राहिला आहे. कर्नाटकात नक्षलींना गुडघ्यावर आणण्यात आयपीएस हेमंत निंबाळकरांचा सिंहाचा वाटा आहे. यावर्षी जानेवारी महिन्यात चिक्कमगलुरू जिल्ह्यात सहा नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण करताना शस्त्रे खाली ठेवली होती. सहा कुख्यात नक्षलींनी आत्मसमर्पण केल्याने कर्नाटक सरकारने राबवलेल्या मोहिमेला मोठे यश आले होते.

बिहारमध्ये नितीशकुमारच एनडीएचे कॅप्टन

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची घोषणा

पाटणा । बिहारमध्ये होणाऱ्या आगामी विधानसभा निवडणुका या नितीश कुमार यांच्याच नेतृत्वाखाली लढवण्यात येतील अशी महत्वपूर्ण घोषणा भाजपचे केंद्रीय नेते अमित शाह यांनी केली असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. बिहारमध्ये २४५ पैकी २२५ जागा एनडीएच्या पारड्यात पाडण्यासाठी सर्वांनी एकत्रित काम करावं अशा सूचनाही त्यांनी दिल्या असल्याची माहिती आहे.

गृहमंत्री अमित शहा बिहार दौऱ्यावर होते. यादरम्यान त्यांनी भाजपचे कार्यालय प्रभारी विनोद तावडे, दोन्ही उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, विजय सिन्हा, भाजप प्रदेशाध्यक्ष दिलीप जैस्वाल, सर्व आमदार, आमदार, खासदार आणि राज्याचे अधिकारी यांची बैठक घेतली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, एनडीएमध्ये पाच पक्ष आहेत. त्यामुळे निवडणूक चिन्ह कोणतेही असो, एनडीएला विजयी करायचे आहे. बिहारमध्ये एवढा मोठा विजय व्हावा, हा संदेश संपूर्ण देशाला द्यायला हवा. पक्षात काही मतभेद असतील तर ते विसरून एकत्र या आणि पान २ वर

बिहारमध्ये २२५ जागांचे लक्ष्य

बिहारमध्ये २४३ पैकी २२५ जागा जिंकण्याचे लक्ष्य अमित शाह यांनी पक्षाच्या नेत्यांसमोर ठेवले आहे. हे लक्ष्य कसे गाठायचे यावरही विचारमंथन झाले. यासोबतच एनडीए आक्रमक रणनीती घेऊन मैदानात उतरणार असल्याचे निश्चित झाले आहे. सुशासन आणि विकासाच्या मुद्यांवर लक्ष केंद्रित केले जाईल.

इंडिगो कंपनीला ९४४ कोटींच्या दंडाची नोटीस

मुंबई । विमान कंपनी इंडिगोला आयर विभागाने दणका दिला आहे. आयकर विभागाने इंडिगोची मालक कंपनी असलेल्या ९४४.२० कोटी रुपयांच्या दंडाची नोटीस दिली आहे. कंपनीनं या आदेशाला चुकीचे ठरवत कोर्टात आव्हान देण्याची भूमिका घेतली आहे. आयकर विभागानं ही नोटीस इंटरग्लोब एविएशन कंपनीला दिली आहे.

इंडिगोने एका नियामक फायलिंगमध्ये म्हटले की आयकर विभागाने असेसमेंट वर्ष २०२१-२२ साठी ९४४.२० कोटी रुपयांच्या दंडाचे आदेश मंजूर केले आहेत. कंपनीने यामध्ये पुढे म्हटले की हे आदेश चुकीच्या समजुतीवर आधारित आहेत. कंपनीने त्यांच्या १४३(३)च्या आदेशा विरोधात अपील केले होते. ते अपील आयकर उपायुक्त (अपील) यांच्याकडून फेटाळण्यात आले. हे प्रकरण प्रलंबित असून यावर निर्णय येणे बाकी आहे, असे कंपनीने म्हटले आहे. या प्रकरणावर आता लवकरच सुनावणी होणार आहे.